भारतीय जनता पक्ष
(केंद्रयि कार्यालय)
11, अशोक रोड, नवी दल्लिी- 110001
फोन- 23005700, फॅक्स 23005787
29 जानेवारी 2013

भाजपचे राष्ट्रयि प्रवक्ता आणि खासदार श्री प्रकाश जावडेकर यांचे प्रेस वक्तव्य

डिझेलच्या दरवाढीचे दुटप्पी धोरण

काँग्रेसच्या नेतृत्तत्ववाली युपिए सरकारद्वारे अंमलात येणा-या डिझेलच्या दराबद्दलच्या दुटप्पी धोरणावर भाजपने तीव्र टिका केली आहे. असे पाऊल उचलल्याने सरकारने सामान्य जनतेवर अभूतपूर्व बोज टाकला आहे.सरकारने डिझेल ला नियंत्रणमुक्त करताना ग्राहकांचे दोन वर्ग केले आहेत. एक म्हणजे घाऊक वापर करणारे आणि दुसरे रिटेल आउटलेट कडून खरेदि करणारे ग्राहक. यात रिटेल आउटलेट कडून खरेदि करणा-या ग्राहकांना डिझेल हे लिटरमागे रु 50 ते 54 रुपये इतके पडेल, तर घाउक व्यापा-यांना डिझेल प्रति लिटिर 62 ते 65 द्यावे लागतील.

राज्य परविहन विभागाला या निर्णयाचा सर्वात मोठा फटका बसेल, कारण की त्यांना वर्षाला रु. 3000 करोड इतके द्यावे लागणार आहेत. अशाच प्रकारे रेल्वेला पण वर्षा वर्षाला रु. 6000 करोड चुकवावे लागणार आहेत. अशा प्रकारे सरकार घाऊक व्यापार करणा-यांची कॅटेगरी उभी करुन जनतेकडून एका झटक्यात रु 18,000 करोड रुपये वसुल करण्याचा प्रयत्न करत आहे.
या सर्वाचा भार सामान्य जनतेवर पडणार आहे. सध्या डिझेलचा भाव, दर महिन्याला वाढत आहेत, त्यातून जनता अजुन सावरलेली नाही आणि आता हे दुसरा फटका बसलेला आहे. डिझेल नियंत्रण मुक्त करण्याचा एकंदर फटका रु.60,000 करोड असू शकतो.

मच्छिमारांना पण घाऊक वापर करणा-यांची कॅटेगरी लागू होणार आहे. ग्राहकांना डिझेल देण्याच्या नव्या नियिमांमुळे शेतकर-यांना पण भाव चुकवावा लागणार आहे.
भाजपने ही दरवाढ त्वरति मागे खेचण्याची मागणी केली आहे. रिटेलमध्ये डिझेलच्या दरात कपात करण्याची पण भाजपाने मागणी केली आहे.

तेलंगण मुद्दा

वेगळे तेलंगण राज्य स्थापति करण्याच्या मागणीसंदर्भात होत असलेल्या विलंबाबद्दल भाजपने ताशेरे ओढले आहेत.

सरकारने 28 जानेवारी, 2013 पर्यंत वेगळे तेलंगण राज्य स्थापन करण्याच्या घेतलेल्या निर्णयाच्या वचनाचा पालन अद्याप पूर्ण करु शकलेले नाही. केंद्रिय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे गेल्या डिसेंबर महिन्यात सर्वपक्षिय बैठकीत हे वचन दिले होते. तेलंगणाच्या जनतेबरोबर सरकारने विश्वासघात केला आहे, जो माफ करण्यालायक नाही.

9 डिसेंबर, 2009 रोजी तत्कालिन गृहमंत्री पी चिदंबरम यांनी असे जाहिर केले होते की, वेगळ्या तेलंगणाचे राज्य स्थापित करण्यासाठी प्रक्रियेचा प्रारंभ झाला आहे, परंतु काँग्रेसच्या राजकारणामुळे याप्रकरणी घोषणा करण्यात अडचणी निर्माण झाल्या. 1980 साली काँग्रेस सरकारने श्री चेन्ना रेड्डी यांच्या आंदोलनाच्या वेळी पण असाच विश्वासघात केला होता.

भाजप सतत वेगळे तेलंगण स्थापन करण्याच्या बाजूने आहे. आम्ही पुन्हा एकदा अशी मागणी करत आहोत की केंद्र सरकारने नव्या राज्याची रचना तात्काळ घोषित करायला पाहिजे आणि बिजेट सत्राच्या पहिल्याच दिवशी त्याबाबतचे बिल आणले पाहिजे. एनडीए कडून या बिलाला बिनशर्त त्वरित पाठिंबा दिला जाईल. नाहितर काँग्रेसला याची भारी किंमत चुकवावी लागेल.

(ओ.पी.कोहली)
हेडक्वार्टर इन्चार्ज